## प्रेसनोट दि. १२/०३/२०१९

## सिंहगड रोड पोलीस स्टेशन,पुणे शहर

### राहते घरी कसे जायचे हे समजुन न येणाा १०२ वर्षाच्या वयोवृध्द महिलेस सिंहगड रोड पोलीसांनी तीचे नातवाचे ताब्यात सुखरुप दिले परत.

---

सिंहगडरोड पोलीस स्टेशन टु-मोबाईल गाडीवर दि. ०९/०३/२०१९ रोजी रात्रपाळी कर्तव्यावर असणारे पोहवा ४६२८ कालीदास सिताराम माताळे व पोहवा २८१२ संभाजी शंकर वाघ हे सिंहगडरोड पो.स्टे. हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना रात्री १०.३० वा. चे सुमारास धायरी फाटा या ठिकाणी आले असता त्यांना तेथे एक वयोवृध्द महिला उभी असल्याचे दिसले. पोहवा वाघ व पोहवा माताळे यांनी सदर महिलेजवळ जावुन त्यांची विचारपुस करता सदर महिलेने तिचे नाव रुपाबाई बाबुराव ठोकळ, वय १०२ वर्षे, असे सांगुन ती भिमनगर, उत्तमनगर या ठिकाणी तीच्या मुलीकडे राहत असलेबाबत सांगीतले. सदर वयोवृध्द महिलेला तीच्या घरी कसे जायचे हे समजत नसल्याबाबत तीने सांगीतले. त्यामुळे पोहवा वाघ व पोहवा माताळे यांनी सदर महिलेस अभिरुची पोलीस चौकी येथे आणले असता अभिरुची पोलीस चौकी डयुटी अमंलदार यांनी सदर महिलेस तीच्या घरी पोच करा असे सांगीतल्याने पोहवा वाघ व पोहवा माताळे यांनी सदर महिलेस सिंहगडरोड पो.स्टे. टु-मोबाईलमध्ये घेवुन भिमनगर, उत्तमनगर या ठिकाणी घेवुन जावुन तीच्या मुलीचा पत्ता शोध घेवुन त्या पत्त्यावर जावुन सदर वयोवृध्द महिलेचा नातु नामे संतोष महादेव गायकवाड, रा. फ्लॅट नं. २०३, दुसरा मजला, निरंजन आकृती बिल्डींग, भिमनगर बस स्टॉपच्या मागे, उत्तमनगर, पुणे यांची भेट घेवुन सदर वयोवृध्द महिला त्याची आजी असल्याची खात्री करुन वयोवृध्द महिला नामे रुपाबाई बाबुराव ठोकळ, वय १०२ वर्षे, यांना त्यांचा नातु नामे संतोष महादेव गायकवाड यांच्या ताब्यात सुखरुप दिल्याने पोलीसांनी तात्काळ केलेल्या सहकार्यामुळे सदर वयोवृध्द महिलेच्या नातेवाईकांनी पोलीसांचे मनपुर्वक आभार व्यक्त केले आहेत.

